# -: नियम व सूचना :-

संचालक आणि सदस्य यांच्यात गैरसमज निर्माण होऊ नयेत म्हणून ही स्पष्ट नियमावली आम्ही आपणांस सादर करीत आहोत. नियमावली कोणत्याही प्रकारे जाचक होणार नाही, याची आम्ही दक्षता घेतली आहे, कृपया गैरसमज नसावा. आम्ही सहल आयोजक आहोत, कोणतीही विमान, शिपिंग कंपनी, रेल्वे, बस, हॉटेल्स आम्ही चालवत नाही किंवा त्यावर आमचा मालकी हक्क नाही. त्यांच्या व्यवस्थापनावर आमचा हक्क किंवा ताबा नसल्याने त्यांच्या व्यवस्थापनाद्वारे उद्भवणाऱ्या कोणत्याही नुकसानिस निसर्ग टूर्स व्यवस्थापक किंवा सहल असिस्टंट कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१. सहलीचा खर्च सोबतच्या पत्रकाप्रमाणे असून या खर्चात बस प्रवास, निवास, दिवसातून दोन वेळा भोजन, दोन वेळा चहा/कॉफी व सकाळी नाश्ता यांचा समावेश आहे. मात्र त्यात रेल्वे भाडे समावेश आहे/नाही.

२. प्रत्येकी ५०% आगाऊ रक्कम भरून आपले नाव नोंदविता येईल. बाकी सगळी रक्कम सहलीपूर्वी ३० दिवसात भरणे आवश्यक आहे.

३. सहलीचा तपशीलवार कार्यक्रम व बरोबर आणायचे सामान याची माहिती सहलीपूर्वी ७ दिवस अगोदर / आधी देण्यात येईल.

४. सहलीचा खर्च हॉटेल / रिसोर्टमध्ये Sharing रूमसाठी अथवा Dormitory रूमसाठी आहे. जो पर्याय निवडला असेल तशी रूमची व्यवस्था होईल. Sharing उपलब्ध नसल्यास Dormitory मध्ये रहावे लागेल.

५. नैसर्गिक आपत्ती किंवा अचानक उद्भवलेल्या कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे प्रवासात संयोजकास सहल मध्येच संपवावी लागली अथवा सहलीचा मार्ग बदलावा लागला तर सदस्याने भरलेल्या रकमेचा कोणताही भाग त्याला परत केला जाणार नाही आणि राहिलेला भाग पूर्ण करण्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही.

६. सहलीमध्ये नाव नोंदवल्यानंतर कोणत्याही कारणास्तव रद्द करावयाचे झाल्यास तसे लेखी विनंतीपत्र द्यावे. ६०, ४५ व ३० दिवस आधी नाव रद्द केल्यास एकूण खर्चाच्या अनुक्रमे २०%, ४०% व ६०% रक्कम Cancellation पोटी जमा करून उरलेली रक्कम सहलीनंतर Account Payee चेक द्वारा परत केली जाईल. ३० दिवस आधी नाव रद्द झाल्यास सहलीचा कोणताही रिफंड दिला जाणार नाही.

७. आपल्या सामानाचे सर्व ठिकाणचे लोडिंग अनलोडिंग आपले आपणच करायचे आहे. त्या दृष्टिने आपले सामान आपणास उचलता येईल एवढ्याच आकाराचे व वजनाचे असावे.

८. सहलीतील दर सोबतच्या पत्रकातील तारखेला ठरविण्यात आलेले आहेत. त्यानंतर बस, विमान, रेल्वे दरात होणारी वाढ पर्यटकांना द्यावी लागेल.

९. रेल्वे प्रवासातील चहा-नाश्ता, भोजन आदीची व्यवस्था पर्यटकांनी आपली आपण स्वखर्चाने करावयाचे आहे.

१०. सहल काळात सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान व मद्यपानास सक्त मनाई राहील.

११. सहल काळात सदस्यांनी कोणत्याही कारणामुळे आजार, जिवीत अपघात, सामान हरवणे, चोरी होणे इत्यादी यांची कोणतीही जबाबदारी मदतनीस किंवा संचालक यांच्यावर नाही.

१२. सहल काळात एखाद्या व्यक्तिच्या गैरवर्तनाने इतर सभासदांस त्रास होत असल्यास त्या सभासदांस सहलीतून बाद करण्याचा अधिकार संयोजकांस राहील व त्या सभासदास कुठल्याही प्रकारचा रिफंड दिला जाणार नाही.

१३. एखादी सहल काही नैसर्गिक आपत्ती, राजकीय परिस्थिती अथवा इतर कुठल्याही कारणांमुळे निघण्यापूर्वी कॅन्सल अथवा पुढे ढकलणे क्रमप्राप्त होत असल्यास त्या सहली संबंधीचा निर्णय संयोजकांमार्फत घेतला जाईल व तो सर्व सभासदांना बंधनकारक राहील.

१४. संस्थेने प्रवासासाठी ठरविलेल्या गाडी व्यतिरिक्त सभासदाने रेल्वे प्रवासासाठी दुसरी कोणतीही गाडी निवडल्यास व ती गाडी मुक्कामाच्या ठिकाणी उशीरा पोहचल्यास किंवा रद्द झाल्यास त्या सभासदास स्वखर्चाने सहलीच्या ठिकाणी यावे लागेल. त्या सभासदाला कुठल्याही प्रकारचा रिफंड दिला जाणार नाही.

१५. प्रवासाची नियोजित गाडी अथवा आरक्षित शयनयान रेल्वे प्रशासन अनपेक्षितपणे अगदी आयत्यावेळी सुध्दा विना पूर्व सूचना रद्द करते. अशा वेळी संपूर्ण सहल रद्द करणे सर्वांच्याच दृष्टीने प्रचंड तोटयाचे असते. त्याकरिता सहल सदस्यांना थोडा त्रास सोसून विनाआरक्षण प्रवास त्याचा वा त्यानंतर दुसऱ्या गाडीने अथवा अन्य वाहनाने करावा लागेल. उपरोक्त कारणास्तव कोणीही सदस्यास सहलीत भाग घेणे रद्द करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सभासदांनी सहलीत सहभागी होण्याचे रद्द केल्यास त्यांनी भरलेली रक्कम वा त्या रकमेचा कोणताही भाग सभासदांस परत केला जाणार नाही.

१६. सहलीपूर्वी ३० दिवस बाकी रक्कम न भरल्यास विना सूचना सभासदांचे नाव रद्द करण्याचा अधिकार संयोजकांकडे राहील व भरलेली आगाऊ रक्कम परत केली जाणार नाही.

१७. सहलीच्या कार्यक्रमात फेरबदल करण्याचे अधिकार संयोजकांकडे राहतील.

मी ______________________________ वरील नियम वाचले असून ते मला मान्य आहेत.

दिनांक : ____________________ सही____________________